# प्रेस नोट

जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांचे अस्थापनेवरील लिपीक-नि-टंकलेखक, तलाठी, वाहन चालक व शिपाई या पदांची भरती करण्यासाठी अर्ज मागविण्यात आले असुन तशी जाहिरात दैनिक पुण्यनगरी या वृतपत्रात दिनांक २०/११/२००९ रोजी प्रसिध्द झाली आहे. सदरील जाहिरातीमध्ये लिपीक-नि-टंकलेखक पदासाठीची खुल्या प्रवर्गातील संमातर आरक्षणा व्यतिरिक्त ८ रिक्त पदे व तलाठी संवर्गातील खुल्या प्रवर्गाची समांतर आरक्षणा व्यतिरिक्त २० पदे विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद येथुन आदेशानुसार, हजेरी सहाय्यक या सवंर्गातून भरण्यात येणार आहेत. या बाबत सविस्तर खुलासा करण्यात येतो की लिपीक -नि-टंकलेखक संवर्गाची २२ पदे रिक्त दर्शविली असली तरी परीक्षेद्वारे संमातर आरक्षणानुसार १४ पदे भरली जातील. उर्वरीत ८ पदे विभागीय आयुक्त कार्यालयातुन हजेरी सहाय्यक संवर्गातुन भरली जातील.

तसेच असाही खुलासा करण्यात येतो की तलाठी संवर्गातील सामाजिक आरक्षणातुन ६० पदे भरावयाची असली तरी परिक्षेद्वारे संमातर आरक्षणातुन ४० पदे भरली जातील व उर्वरीत २० पदे विभागीय आयुक्त कार्यालयातुन हजेरी सहाय्यक संवर्गातुन भरली जातील. इच्छुक अर्जदाराच्या माहितीसाठी सुस्पष्ट खुलास करण्यात येत आहे.

उपरोक्त जाहिरात या कार्यालयाच्या संकेत स्थळावर (वेबसाईट) वर उपलब्ध आहे. त्याचा पत्ता http://www.beed.nic.in असा आहे. याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

जिल्हाधिकारी, बीड